# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासनअधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वेदिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजीस्थापितव महाराष्ट्रसार्वजनिकविद्यापीठअधिनियम, २०१६ (सन २०१७ चामहाराष्ट्र विद्यापीठअधिनियमक्रमांक ६) व्दारासंचालितराज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनीक्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि/परीक्षावि./ १९८२/२०२०

दि. १९/०५/२०२०

## परीपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/विभाग प्रमुख
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :- उन्हाळी २०२० परीक्षांचे नियोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत.
संदर्भ :- मा. शिक्षण संचालक यांचे पत्र क्र. युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/४१३१/ए, दि. ०८ मे २०२०

गोंडवाना विद्यापीठाशी सलंग्नीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख तसेच सर्व संबधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शासनाकडून प्राप्त अहवाला नुसार उन्हाळी २०२० परीक्षेबाबतच्या नियमाबाबत् विद्यापीठाद्वारे मार्गदर्शक सुचना संलग्नीत केलेल्या आहेत. सदर सुचना सर्व संबधीत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्याची जबाबदारी प्राचार्याची/विभागप्रमुखांची राहील. सलंग्नीत बाबीमध्ये काही नैसर्गिक कारणास्तव बदल झाल्यास आपणास सुचित करण्यात येईल.

सहपत्र - वरीलप्रमाणे

19.5.2020
(डॉ. अनिल चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी** -

१. मा. कुलगुरु, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोल
२. मा. कुलसचिव, यांचे कार्यालय, गोंड़वाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे - १
४. मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपुर, विभाग नागपूर

पोटकल

# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या २ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com

जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./१९८३/२०२०

दिनांक : १९/०५/२०२०

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## उन्हाळी २०२० परीक्षा व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ बाबत मार्गदर्शक सुचना

कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने गठीत समितीच्या शिफारशी उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कडून शासन पत्र क्र. संकिर्ण युएनआय/४१३१, दि. ०८ मे २०२० नुसार विद्यापीठाला प्राप्त झाल्या आहेत. सदर पत्रानुसार अनेक विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी परीक्षा संचालनासंदर्भात चौकशी करून शंका व्यक्त केलेल्या आहेत. त्यामुळे प्राथमिक स्वरूपात शंकांचे खालील प्रमाणे निरसन करण्यात येत आहे. मात्र या शिफारशी अंतीम नसुन सक्षम प्राधीकरणास सादर करून प्राधिकरणाने सुचविलेल्या बदलासह अंतीम करण्यात येतील.

1. परीशिष्ट 'अ' मध्ये नमुद सत्रातील नियमीत विद्यार्थ्यांची उन्हाळी – २०२० ची परीक्षा घेण्यात येणार नाही. अशा सर्व विद्यार्थ्यांना मिळणारा ग्रेड हा ५०% अंर्तगत मुल्यमापनावर आधारीत असेल आणि ५०% मागच्या सत्रातील परीक्षेचे सरासरी गुण लक्षात घेऊन ठरविल्या जाईल व तशी गुणपत्रिका सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे वितरीत केल्या जाईल.
2. अंर्तगत मुल्यमापनाचे गुण हे विषयाचे निरंतर मुल्यमापन, सत्रपूर्व परीक्षा व सत्रमध्य परीक्षा या आधारावर द्यावयाचे आहेत, त्यामुळे महाविद्यालयाने घेतलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका व निरंतर मुल्यमापनाच्या राबविलेल्या प्रक्रियेचे दस्तावेज सिलबंद लिफाफ्यामध्ये बंद करून महाविद्यालयामध्येच सुरक्षित जतन करून ठेवावे. विद्यापीठाने मागणी केल्यानंतर सदर दस्तावेज सादर करणे बंधनकारक राहील.
3. अनु. क्र. १ व २ नुसार विद्यापीठाद्वारे दिलेले गुण एखाद्या विद्यार्थ्यास मान्य नसल्यास, अशा विद्यार्थ्याला प्राप्त श्रेणी (ग्रेड) मध्ये सुधारणा करावयाची असल्यास, हिवाळी २०२० परीक्षेमध्ये परीक्षा आवेदन पत्र भरून परीक्षा देता येईल व त्या परीक्षेत प्राप्त होतील ते गुण अंतिम समजण्यात येतील.
4. परीशिष्ट 'ब' मध्ये दर्शविलेल्या सर्व नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठाद्वारे घेतल्या जाईल. परीक्षेचे स्वरूप, पध्दती व वेळापत्रक कोविड - १९ मुळे उद्भवलेल्या परीस्थितीच्या अनुषंगाने सामाजिक अंतर, विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य यांचे गांभिर्य लक्षात घेऊन पुरेसा वेळ देवून लवकरच घोषीत केल्या जाईल.
5. परीशिष्ट 'ब' मधील सर्व नियमित विद्यार्थ्यांचे त्यांच्या पुर्वीच्या (मागील सत्र) सत्रातील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा विद्यापीठाद्वारेच वरील परीच्छेद क्र. ४ मधील नमूद तरतुदीनुसार घेतल्या जातील.
6. परीशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या विद्यार्थ्यांचे मागील सर्व सत्राच्या परीक्षेतील अनुशेष असल्यास अशा सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व सत्रांच्या परीक्षा विद्यापीठाद्वारेच घेतल्या जातील. सदर परीक्षा सत्र २०२०–२१ सुरू झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत सोईनुसार घेण्यात येतील. मात्र परीक्षेचे स्वरूप, पध्दती व कालावधी विद्यापीठाद्वारे नंतर कळविण्यात येईल.
7. जे विद्यार्थी पुढील सत्राच्या प्रवेशापासून खंडीत (D.C) झाले असतील व शैक्षणिक सत्र २०१९– २० मधे नियमीत प्रवेशीत नाहीत, असे सर्व विद्यार्थी 'कॅरी फारवर्ड' च्या पध्दतीनुसार शैक्षणिक सत्र

२०२०—२१ मध्ये प्रवेशासाठी पात्र असतील. परंतू ही सुविधा फक्त विद्यमान शैक्षणिक वर्षापुरतीच असेल आणि असा प्रत्येक विद्यार्थी गैरहजर किवा अनुतीर्ण विषयाच्या परीक्षेचे विद्यापीठाद्वारे जेव्हा नियोजन होईल तेव्हा ती परीक्षा उत्तिर्ण करेल व अशा सर्व परीक्षा शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येतील.

8. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती टाळेबंदी सुरू होण्यापूर्वी ७५% पेक्षा कमी असेल अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता टाळेबंदीचा कालावधी हा त्या विद्यार्थ्याचा उपस्थिती कालावधी म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.
9. उपरोक्त उल्लेखीत आयोजीत करण्यात येणा—या परीक्षा या विद्यापीठाच्या १००% (संपूर्ण) अभ्यासक्रमावर आधारीत असतील.
10. पदविका, पदवीपूर्व व पदव्युत्तर परीक्षेच्या अंतीम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेतांना छोटया तुकडयात तसेच कमीत — कमी वेळेत एका दिवसात अनेक तुकडयात घ्यावयाच्या आहेत. अंतर्गत व बर्हिगत परीक्षक संबंधीत महाविद्यालयाने शक्यतो आपल्याच महाविद्यालयातील प्राध्यापकांना नेमावयाचे आहे, मात्र संबंधीत महाविद्यालयात बहिर्गत पर्यवेक्षक उपलब्ध नसल्यास लगतच्या महाविद्यालयातील अथवा लगतच्या परीसरातील प्राध्यापकांची बहिर्गत परीक्षक म्हणुन महाविद्यालयाने आपल्या स्तरावरून नेमणुक करावी व दिलेले गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा संपल्यानंतर लगेच विद्यापीठाकडे पाठवावयाचे आहेत. जर, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बोलावून मुल्यमापन करणे शक्य नसेल तर त्यांचे जर्नल्स, अंतर्गत परीक्षा व मौखीक परीक्षा ऑनलाईन घेउन या आधारावर त्याचे मुल्यमापन करावयाचे आहे. प्रत्येक महाविद्यालयाने प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक आपआपल्या सोईनुसार व शासनाच्या कोविड – १९ संदर्भातील मार्गदर्शक सुचनेनुसार तयार करावयाचे आहे.
11. सर्व परीशिष्ट 'अ' व 'ब' मधे नमुद सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे निकाल घोषित करून गुणपत्रिका दिल्या जातील.
12. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व बहि:शाल विद्यार्थ्यांच्या परीक्षा यथायोग्य वेळेनुसार विद्यापीठाद्वारे घेतल्या जाईल. तसेच अश्या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व सत्राच्या परीक्षा विद्यापीठाच्या प्रचलीत नियमानूसार घेण्यात येतील.
13. आचार्य पदवी व एम.फील या अभ्यासक्रमाचे 'व्हायवा—व्होसे' घेण्याकरीता उपलब्ध तंत्रज्ञानाच्या माध्यमाचा (व्हीडिओ कान्फरन्सिंग) विद्यापीठाद्वारे वापर केला जाईल व त्यामुळे या संदर्भात ज्या संशोधक विद्यार्थ्यांचे 'व्हायवा — व्होसे' घ्यावयाचे असतील अशा सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी या संदर्भात परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभागाशी संपर्क साधावा, मात्र या करीता विद्यापीठाचे नियम व विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१६ ला निर्गमीत केलेल्या ९.६ व ९.९ या अधोरेखांकित केलेल्या बाबीची पूर्तता करण्याची काळजी विद्यापीठाद्वारे तंतोतंत घेतली जाईल.
14. ज्या आचार्य व एम.फील अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना त्यांचे शोधप्रबंध, प्रबंधिका सादर करण्याची अंतीम तारीख किंवा कमाल मर्यादा विद्यापीठाच्या प्रचलीत नियम, अधिनियम यानुसार संपुष्टात आलेली असेल किंवा कोविड – १९ च्या टाळेबंदी काळात संपुष्टात येईल, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शोधप्रबंध, प्रबंधिका व त्याचबरोबर ईतर बाबी सादर करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२० पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.
15. जे विद्यार्थी टाळेबंदी मुळे विहित मुदतीत परीक्षा आवेदनपत्र सादर करू शकले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांना आवेदन पत्र सादर करण्यास यथायोग्य मुदतवाढ देण्यात येईल व तशा सुचना विद्यापीठाच्या www.unigug.ac.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

## परीशिष्ट – 'अ'

| अनु. क्र. | अभ्यासक्रमाचे एकुण वर्ष | सत्र |
|---|---|---|
| १ | दोन वर्षीय अभ्यासक्रम | २ |
| २ | तिन वर्षीय अभ्यासक्रम | २ व ४ |
| ३ | चार वर्षीय अभ्यासक्रम | २, ४ व ६ |
| ४ | पाच वर्षीय अभ्यासक्रम | २, ४, ६ व ८ |

## परीशिष्ट – 'ब'

| अनु. क्र. | अभ्यासक्रमाचे एकुण वर्ष | सत्र |
|---|---|---|
| १ | एक वर्षीय अभ्यासक्रम | सर्व विद्यार्थी |
| २ | दोन वर्षीय अभ्यासक्रम | ४ |
| ३ | तिन वर्षीय अभ्यासक्रम | ६ |
| ४ | चार वर्षीय अभ्यासक्रम | ८ |
| ५ | पाच वर्षीय अभ्यासक्रम | १० |

16. शैक्षणिक वेळापत्रक (Academic calender)

विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक खालील प्रमाणे घोषीत करण्यात येत आहे. मात्र भविष्यात काही विपरीत परीस्थिती उद्‌भवल्यास अथवा शासनाने काही मार्गदर्शक सुचना निर्देशीत केल्यास त्यात परीस्थितीनुरूप विद्यापीठाद्वारे वेळोवेळी बदल केल्या जाईल.

| | |
|---|---|
| महाविद्यालये सुरू होण्याची तारीख | दि. १५ जून २०२० (तात्पुरत्या स्वरूपात) |
| शैक्षणिक उपक्रमांच्या पूर्वतयारीचा कालावधी | दि. ३० जून, २०२०पर्यत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षा वगळून इतर सर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची तारीख | दि. १५ जुलै २०२० पर्यत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षा व त्यांच्या इतर अनुशेष परीक्षांच्या तारखा | दि. १६ जुन ते दि. ३१ जुलै, २०२० |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षांचे तसेच त्यांच्या अनुशेष परीक्षांचे निकाल | दि. १५ ऑगस्ट, २०२० पर्यत |
| शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१:<br>अ) पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तरच्या अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ष वगळून सर्व अभ्यासक्रमांचे नियमीत वर्ग<br>ब) प्रथम वर्ष – पदविका, पदवीपूर्व आणि पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचे नियमीत वर्ग | अ) दि. ०१ ऑगस्ट, २०२० पासून<br>ब) दि. ०१ सप्टेंबर २०२० पासून |

मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने

सही. 19/5/2020

(डॉ. अनिल चिताडे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली